|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

## Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)

'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

## विद्यार्थी विकास विभाग

जा.क्र. कबचौउमवि/14/पोगाका-67/ 18 /2020 दि.15/01/2020

प्रति,

**मा.प्राचार्य / मा. संचालक / विभाग प्रमुख,**
**विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालय / मान्यता प्राप्त परिसंस्था व**
**विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा-विभाग यांना -**

**विषय:- विद्यापीठस्तरीय पोवाडा गायन कौशल्य कार्यशाळेच्या सहभागाबाबत.....**
**संदर्भ:-** विद्यापीठाचे पत्र क्र.उमवि/14/विवि-46/192/2019, दि.23/07/2019

महोदय / महोदया,

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागामार्फत पदवी-पदव्युत्तर नियमित शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास व्हावा याकरीता सातत्याने विविध स्पर्धा, कार्यशाळा, चर्चासत्रे, युवक महोत्सव, प्रदर्शन व मार्गदर्शने आयोजित केली जातात.

याअनुषंगाने विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास होऊन त्यांच्या अंतर्भूत कला गुणांना विकासाची संधी मिळावी व महाराष्ट्राची पारंपारिक परंपरा असलेली पोवाडा गायन कला जोपासली जावी या हेतुने **पोवाडा गायन कौशल्य कार्यशाळेचे** आयोजन **दि.04 ते 06 फेब्रुवारी, 2020** या कालावधीत **धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर, जि.जळगाव** येथे आयोजित करण्यात येत आहे.

प्रस्तुत अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, पोवाडा गायन कौशल्य कार्यशाळेत विद्यार्थ्यांना पोवाडा गायन क्षेत्रातील नामांकित कलाकरांना बोलावून मार्गदर्शन व गायन सादरीकरणाचे प्रयोग सादर केले जाणार आहे. त्यासाठी आपल्या महाविद्यालय/मान्यता प्राप्त परिसंस्था/शैक्षणिक प्रशाळा विभाग मधील खालील निकषानुसार **06 विद्यार्थी (03 विद्यार्थी व 03 विद्यार्थिनी)** निवड करून पाठवावेत, ही विनंती.

* सदर विद्यार्थी गुणवत्ताधारक, आज्ञाधारक, कुशल, बोलका निर्णय घेणारा, कला जोपासणारा व नेतृत्व गुण सांभाळणारा असावा.
* सदर विद्यार्थी या शैक्षणिक वर्षात (सन 2019-2020) नियमित शिक्षण घेणारा असावा. त्याच्या/तिच्याकडे अद्यावत (प्राचार्य/संचालक यांच्या सही व शिक्का असलेले) ओळखपत्र असावे.
* सदर विद्यार्थी-विद्यार्थिनीने यापूर्वी विद्यापीठ / राज्य / राष्ट्रीय स्तरावरील पोवाडा गायन कौशल्य कार्यशाळेत सहभाग घेतलेला नसावा.

कृपया निकषानुसार निवड झालेल्या विद्यार्थ्यांची निवास, चहा अल्पोहार व भोजन व्यवस्था आयोजकांमार्फत नि:शुल्क केली जाईल. मात्र त्यांचा येण्याजाण्याचा प्रवासखर्च विद्यार्थी प्रवास सवलत दराने महाविद्यालयाच्या विद्यार्थी विकास निधीतून करावा.

* **कार्यशाळेच्या अनुषंगाने आवश्यक सूचना :-**
* पोवाडा गायन कौशल्य कार्यशाळा उद्घाटन सोहळा दि. 04 फेब्रुवारी, 2020 रोजी सकाळी 10.00 वाजता आयोजित करण्यात आलेला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी सकाळी 9.00 वाजेपर्यंत कार्यशाळा स्थळी उपस्थित राहाणे अगत्याचे आहे.
* कार्यशाळा कालावधी 2 दिवसांचा असल्याने विद्यार्थ्यांनी गरजेनुसार आवश्यक साहित्य, पाणी बॉटल, पांघरुण, गरम कपडे, बॅटरी, कापडी बुट-मोजे तसेच गरजेनुसार आवश्यक औषधी सोबत आणावी. कृपया विद्यार्थ्यांनी मौल्यवान वस्तू / मोबाईल वा गरजेपेक्षा अधिक रक्कम सोबत आणू नये.
* कार्यशाळेला केवळ 03 विद्यार्थी व 03 विद्यार्थिनी यांचीच निवड करून त्यांना पाठवावे. निर्धारीत संख्येपेक्षा अधिक विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार नाही. कार्यशाळेत 03 विद्यार्थी व 03 विद्यार्थिनी येणे आवश्यक आहे. जर विद्यार्थिनी ऐवजी 06 विद्यार्थी पाठविलेत तर त्यांचा प्रवेश नाकारला जाईल (फक्त मुलींचे महाविद्यालय / परिसंस्था वगळून) याची कृपया नोंद घ्यावी.

* कार्यशाळेत विद्यार्थ्यांची गटवार विभागणी करण्यात येत असल्याने त्यांना मिळालेल्या गटातच प्रशिक्षण व कला सादर करणे बंधनकारक राहिल.

* निवड करण्यात आलेला विद्यार्थी हा/ही महाविद्यालयातील नियमित प्रवेशित असावा/ असावी व त्याच्या/ तिच्या कडे महाविद्यालयाचे ओळखपत्र असावे. तात्पुरता प्रवेश (Provisional Admission) घेतलेल्या विद्यार्थ्यांना कृपया स्पर्धेसाठी पाठवू नये.

* पोवाडा गायन कौशल्य कार्यशाळा असल्याने कला सादरीकरणासाठी विद्यार्थ्यांनी पांरपारिक वेशभूषा, वाद्ये व आवश्यक साहित्य सोबत आणावे.

* कार्यशाळा कालावधीत मित्र, मैत्रिण, अथवा स्थानिक नातेवाईक यांना भेटीसाठी बोलविता येणार नाही. तसेच गैरवर्तन आढळल्यास विद्यार्थ्यांना कार्यशाळेतून तात्काळ परत पाठविण्यात येईल.

* **कार्यशाळेच्या अनुषंगाने आवश्यक माहिती व संपर्कासाठी -**

1. मा. डॉ. पी. आर. चौधरी, प्राचार्य, कार्यालय दू.क्र.02585-245236, ई-मेल dnmfaizpur@gmail.com
2. डॉ. गोपाळ गोरख कोल्हे, विद्यार्थी विकास अधिकारी, भ्र.क्रमांक - 9423489025

उपरोक्त अनुषंगाने आपणांस पुन:श्च कळविण्यात येते की, **विद्यापीठस्तरीय पोवाडा गायन कौशल्य कार्यशाळेत** निवड केलेल्या विद्यार्थ्यांचे विद्यापीठामार्फत पुरविलेल्या नमुन्यातील अर्ज, पालकांचे संमतीपत्रक व आपले शिफारसपत्र **दि.03/02/2020** पर्यंत **धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर, जि. जळगाव** यांना ईमेल dnmfaizpur@gmail.com पाठवून सहकार्य करावे व विद्यार्थ्यांना परिपत्रकातील सुचनेप्रमाणे उपस्थित राहाण्याच्या सूचना द्याव्यात. सदर परिपत्रक व विद्यार्थी स्वंयवृत्त विद्यापीठ **www.nmu.ac.in** या संकेत स्थळावर भेट दिल्यास उपलब्ध आहे.

कळावे,

आपला विश्वासू,

(डॉ. सत्यजित साळवे)

**संचालक, विद्यार्थी विकास**

* **सोबत :-** विद्यार्थी स्वयंवृत्त

* **प्रत माहितीसाठी :-**

1. मा. प्राचार्य, **संत मुक्ताबाई कला व वाणिज्य महाविद्यालय, मुक्ताईनगर, जि.जळगाव**
2. प्रा.पवन चुडामण पाटील, जळगाव जिल्हा विद्यार्थी विकास समन्वयक, कै. न्हानाभाऊ मन्साराम तुकाराम पाटील कला महाविद्यालय, मारवड, ता.अमळनेर, जि.जळगाव
3. मा. वित्त व लेखा अधिकारी, कबचौउमवि, जळगाव
4. प्र.उपकुलसचिव, कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
5. उपकुलसचिव, प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
6. मा. विभाग प्रमुख, उत्तमविद्या अंक, जनसंवाद पत्रकारिता विभाग, कबचौउमवि, जळगाव
7. मा.जनसंपर्क अधिकारी, कबचौउमवि, जळगाव
8. मा.पध्दती विश्लेषक, संगणक शास्त्र प्रशाळा, कबचौउमवि, जळगाव

*D:\\VBOXSVR\xp_data\RMB\Powada Gayan karyashala 2019-2020.docx*

पासपोर्ट
साईज रंगीत
फोटो

## विद्यार्थी स्वयंवृत्त

## विद्यापीठस्तरीय पोवाडा गायन कौशल्य कार्यशाळा

1) विद्यार्थ्याचे नाव (आडनाव प्रथम) :- ------------------------------------------------------------

2) वर्ग :- -------------

3) जन्म तारीख :- / /

4) शारीरिक दृष्ट्या सक्षम :- होय / नाही

5) रक्त गट :- ------

6) पत्र व्यवहार पत्ता (निवास) :- ------------------------------------------------------------
------------------------------------------------------------

7) दूरध्वनी क्र. :- ( )

8) भ्रमणध्वनी क्र. :-

09) महाविद्यालय/परिसंस्था/प्रशाळा यांचे नाव :- -------------------------------------------------

10) दूरध्वनी क्र. :- ( )

11) ओळखपत्र क्र. :- -----------------

12) विद्यार्थी विकास उपक्रम सहभाग :- -----------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------

13) स्वयंपूर्तीने आयोजित कार्यक्रम :- ------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------

**विद्यार्थी / विद्यार्थीनीची सही व नाव**

---

**-: पालकाचे संमती पत्र :-**

संमती पत्र लिहून देतो/देते की, श्री/सौ./ ------------------------------------------ माझा पाल्य मुलगा/मुलगी नामे --------------------------------------- हा/ही सदर कार्यशाळेत स्वयंप्रेरणेने व माझ्या सहमतीने सहभागी होत आहे. त्याला/तिला प्रवास व कार्यशाळा सहभाग कालावधीमध्ये शारीरिक दुखापत, मोठी हानी झाल्यास महाविद्यालय/विद्यापीठ यांना जबाबदार धरणार नाही. त्यांच्याकडे कोणताही नुकसान भरपाई व मानहानी दावा करणार नाही.

**पालक/वडील/आई यांचे नाव व स्वाक्षरी**

---

**-: महाविद्यालय/मान्यता प्राप्त परिसंस्था/शैक्षणिक प्रशाळा यांचे शिफारस पत्र :-**

विद्यार्थी नाव ------------------------------- हा/ही नियमित शिक्षण घेत असून नमूद माहिती नोंदी प्रमाणे बरोबर आहे. विद्यापीठस्तरीय पोवाडा गायन कौशल्य कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी शिफारस करीत आहे.

दिनांक :- / /2020

**विद्यार्थी विकास अधिकारी**
नाव व सही

**प्राचार्य/संचालक**
सही व शिक्का